आदिवासी उपयोजनांतर्गत " शालेय शिक्षण" या उपशिर्षाखाली सन २०१५-१६ च्या राज्य स्तरीय योजना **लेखाशिर्ष २२०२ १९०१ , २२०२ १९४८ व २२०२एच ९७३ (राज्य स्तरीय योजना)** खाली निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१५/प्र.क्र.०२/कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - ०७ जानेवारी, २०१६.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/अर्थ-३, दि.३०.३.२०१५.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.
३) आ.वि. वि, शासन निर्णय क्र. बीयुडी- २०१५/ प्र.क्र. ०२/ का-०६, दि. ०९-०४-२०१५.
४) शालेय शिक्षण विभाग, नस्ती क्रमांक- अनुवि- २०१५/ प्र.क्र. ३२ (अ) / शिकाना/ अर्थसंकल्प.

शासन निर्णय-

आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण पंचवार्षिक- योजनांतर्गत योजना, ०२- माध्यमिक शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०१) ०२) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान (२२०२ १९०१) तसेच (०१) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान (२२०२ १९४८) आणि (०१) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान (२२०२ एच ९७३) ३६- सहायक अनुदान (वेतन) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वर्षात अर्थसकल्पिय तरतूदीच्या ७० % प्रमाणे प्रत्येकी रु. २८००.०० लक्ष, रु. १२५.२२ लक्ष आणि रु. १०९७.६० लक्ष इतका निधी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना यापूर्वीच वितरीत केला आहे.

सदरहू निधी शालेय शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनांच्या वेतनावर खर्च केला जात असल्याने आता, उर्वरीत खालीलप्रमाणे निधी नियंत्रक अधिकारी, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	योजना	अर्थसंकल्पित तरतूद (लाखात)	यापुर्वी वितरीत तरतूद(लाखात)	प्रस्तावित वितरण (लाखात)
१	सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान. (२२०२ १९०१)	४०००.००	२८००.००	**१२००.००**
२	अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान (२२०२ १९४८)	१७८.८	१२५.२२	**५३.६६**
३	सैनिक शाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला सहाय्य (२२०२ एच ९७३)	१५६८.००	१०९७.६०	**४७०.४०**

२. **उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी**.

३. सदर वितरीत निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी यांना सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित निधीच्या मर्यादेत तसेच शासन पत्र आदिवासी विकास विभाग क्रमांक अशाशा २०११/ प्र.क्र. ५९ / का.११, दि. १९ जानेवारी, २०१२ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०१५/ प्र. क्र. ८५ /अर्थ-३, दिनांक १७-०४-२०१५ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०१५/ प्र.क्र. ३४ / कोषा. प्रशा. ५, दि. २४-०७-२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या तसेच वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ३३५/व्यय-१४, दिनांक ३१-१२-२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०७१५३३४४२५२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhagwan Maruti Sawant

Digitally signed by Bhagwan Maruti Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Maruti Sawant
Date: 2016.01.07 17:05:57 +05'30'

भगवान सावंत
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ नागपूर/ अमरावती.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (अर्थ-१९) / (व्यय-१४) मंत्रालय, मुंबई-३२
८. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.